सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात विभागीय सहाय्यक संचालक, कुटुंब कल्याण, माता- बाल संगोपन, पुणे यांच्या कार्यालयातील वाहन चालकाच्या एका अस्थायी पदास दि. ०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ या कालावधी पर्यंत मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः अस्थायी २०१९/२७५/प्र.क्र.८६/ कु.क.

१० वा मजला, बी विंग, गो. ते. रूग्णालय संकूल इमारत
नवीन मंत्रालय, लो.टि. मार्ग, मुंबई- ४०० ००१
तारीख: १५ मार्च, २०१९

वाचा -

१) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांकः अस्थायी -२०१७/२७०/ प्र.क्र.१०६/कुक, दिनांक : २४.१०.२०१८
२) सह संचालक, आरोग्य सेवा, (अ व प्र), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/आस्था/कक्ष ५/टे ५/०१ अपदे/ ७५७-५८/१९, दि.१६.०२.२०१९
३) वित्त विभाग,शासन निर्णय क्रमांकः पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आपुक, दि.२१.०२.२०१९

प्रस्तावना -

विभागीय सहाय्यक संचालक, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन, पुणे यांच्या कार्यालयातील वाहन चालकाच्या एका अस्थायी पदास संदर्भ क्र.१ अन्वये दि.०१.१०.२०१८ ते दि.२८.०२.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर अस्थायी पदास दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय-

संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिपत्त्याखालील विभागीय सहाय्यक संचालक, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन, पुणे यांच्या आस्थापनेवरील वाहन चालकाच्या एका अस्थायी पदास दि.०१.०३.२०१९ ते दि.३०.०९.२०१९ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. या पदावर होणार खर्च मागणी क्र.आर-१, मुख्य लेखाशीर्ष २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ००१ संचालन व प्रशासन, (०१) (०२)- प्रादेशिक कार्यालये, (२२१० ०३५१) या लेखा शिर्षाखाली दर्शवावा व सन २०१९-२०२० या वर्षात या लेखा शिर्षाखाली अर्थसंकल्पीत केलेल्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक, दि.२१/०२/२०१९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३१५११२७३१७९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ujwala Arun Ransing

Digitally signed by Ujwala Arun Ransing
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a7788b3b31e2d9269bcbfd9588a6ee4771341780133d295a56dd4ef476977773, serialNumber=3b8f98f1c182bf458a4deee399a7241b5044aeb09c097bc6d28b58709fe8ef0d, cn=Ujwala Arun Ransing
Date: 2019.03.15 13:04:18 +05'30'

(उज्वला अ. रणसिंग)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल,महाराष्ट्र -१/२ (लेखापरीक्षा/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
२. अधिदान व लेखा कोषागार, मुंबई.
३. आयुक्त (कु.क.) तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
४. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
५. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे
६. जिल्हा कोषागार अधिकारी , पुणे
७. वित्त विभाग (व्यय-१३) मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती (कु.क.).